Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

Original Article

# मराठवाड्यातील लोकसंख्येचा अभ्यास - एक भौगोलिक विश्लेषण

**डॉ. खडके सुरेखा बाबुराव**
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकुर
ता. चाकूर जि. लातूर
**Email:** khadkesurekha87@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180332
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 3(B)
Pp. 131-134
March - 2026

**Submitted:** 01 Mar. 2026
**Revised:** 12 Mar. 2026
**Accepted:** 24 Mar. 2026
**Published:** 31 Mar 2026

सारांश

*मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा विभाग असून त्याच्या लोकसंख्येची रचना, वितरण व लिंगगुणोत्तर या घटकांचा प्रदेशाच्या सामाजिक व आर्थिक विकासावर मोठा प्रभाव पडतो. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधील लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या वाढीचा दर आणि लिंगगुणोत्तर यांचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे तसेच जनगणना अहवाल यांसारख्या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की मराठवाड्यात लोकसंख्येचे वितरण समान नसून संभाजीनगर, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक आहे, तर हिंगोली, धाराशिव व परभणी या जिल्ह्यांमध्ये तुलनेने कमी लोकसंख्या आढळते. तसेच काही जिल्ह्यांमध्ये लिंगगुणोत्तर राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास येते. सामाजिक रूढी, शिक्षणाचा अभाव, स्थलांतर, बालविवाह तसेच वैद्यकीय तंत्रज्ञानाचा गैरवापर ही लिंगगुणोत्तरातील विषमतेची प्रमुख कारणे असल्याचे आढळून येते. मराठवाड्याच्या संतुलित व शाश्वत विकासासाठी लोकसंख्येचे योग्य नियोजन व स्त्री-पुरुष समानतेबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.*

***मुख्य शब्द:*** *मराठवाडा, लोकसंख्या वितरण, लोकसंख्या वाढ, लिंगगुणोत्तर, जिल्हानिहाय लोकसंख्या, स्थलांतर, सामाजिक विषमता, जनगणना, भौगोलिक विश्लेषण, लोकसंख्या रचना.*

**प्रस्तावना:**

लोकसंख्येचे वितरण लोकसंख्येची लिंगगुणोत्तर मराठवाड्याच्या लोकसंख्येची वाढ ही महाराष्ट्राच्या लोकसंख्या वाढीच्या सुसंगत आहे परंतु काही स्थानिक घटक या वाढीवर परिणाम करतात लोकसंख्या वाढ ही जन्मदर मृत्युदर आणि स्थलांतर या मुख्य घटकावर अवलंबून असते मराठवाड्यात हे स्वातंत्र्य नंतरच्या काळात लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कोणत्याही प्रदेशाचा सर्वांगीण विकास देखील लोकसंख्येवर अवलंबून असते एखाद्या प्रदेशाची लोकसंख्या अधिक असणे किंवा अतिरिक्त असणे हे त्या देशाच्या दृष्टीने हिताचे नसते लोकसंख्या रिक्त असल्यामुळे साधन संपत्तीचा पर्याय उपयोग होत नाही त्याचे उत्पादन कार्यामध्ये कामगाराचा तुटवडा निर्माण होतो त्यामुळे प्रदेशाच्या एकूण उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊन प्रदेशाचा आर्थिक विकास योग्य पद्धतीने होत नाही तर लोकसंख्या अतिरिक्त होण्यामुळे कुंपोषण उपासना दारिद्र्य बेरोजगारी निवास शिक्षण आरोग्य सुविधाचा तुटवडा निर्माण होतो कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या ही त्या प्रदेशाची साधन संपत्ती असते लोकसंख्या गुणवत्तेवर लोकसंख्येचे महत्त्व अवलंबून असते त्यामुळे कोणतेही प्रदेशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यामध्ये लोकसंख्या साधन संपत्तीला अन्याय साधारण महत्त्व आहे लोकसंख्या वाढ ही लोकसंख्येच्या इतर कोणत्याही वैशिष्ट्ये पेक्षा अतिशय व स्थिर आहे. लोकसंख्या वेगाने वाढवून अतिरिक्त झाल्यास आर्थिक सामाजिक आणि राजकीय समस्या निर्माण होतात. लोकसंख्या वाढ हा शब्द भूगोलामध्ये लोकसंख्येतील बदल या अर्थाने वापरला जातो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. खडके सुरेखा बाबुराव, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकुर ता. चाकूर जि. लातूर*

***How to cite this article:***
*खडके, . सुरेखा . बाबुराव . (2026). मराठवाड्यातील लोकसंख्येचा अभ्यास - एक भौगोलिक विश्लेषण. Journal of research and development, 18(3(B)), 131–134.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21157868*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21157868
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

**अभ्यास पद्धती:-** माहिती संकलन करण्यासाठी दुय्यम साघन साधनसामग्रीचा वापर केलेला आहे मासिके, वर्तमानपत्रे, पुस्तके, संदर्भ ग्रंथ पद्धतीचा अवलंब केला आहे.

अभ्यास क्षेत्र:-

मराठवाडा हा महाराष्ट्राच्या सहा प्रशासकीय विभागापैकी एक विभाग असून औरंगाबाद जालना परभणी हिंगोली नांदेड बीड लातूर आणि उस्मानाबाद या आठ जिल्ह्याचा मिळून तो बनलेला आहे.

मराठवाडा विभागाचा अक्षवृत्तीय विस्तार 17 डिग्री 35 'उत्तर ते 20 डिग्री उत्तर 40 उत्तर आणि रेखावृत्ते विस्तार 74 डिग्री 40' पूर्व ते 78 डिग्री 15 'पूर्व या दरम्यान आहे

**उद्दिष्टे:-**

1. मराठवाड्यातील जिल्हा निहाय लोकसंख्येचे वितरण अभ्यासणे.
2. मराठवाड्यातील लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे.
3. मराठवाड्यातील लिंग गुणोत्तरात विषमता असण्याची कारणे अभ्यासणे.

**विषय विवेचन:-**

मराठवाड्यात लोकसंख्येचे वितरण खालील प्रमाणे आढळते. मराठवाड्यातील संभाजीनगर येथे 37, 01,282 इतकी लोकसंख्या असून दशवार्षिक लोकसंख्या वाढीचा दर (27.37 टक्के) आहे. नांदेड जिल्ह्यात 33, 61,292 इतकी लोकसंख्या असून लोकसंख्या वाढीचा दर 16.65 टक्के आहे तर लातूर जिल्ह्यात 24, 54,196 इतकी लोकसंख्या असून लोकसंख्या वाढीचा दर 18.64 टक्के आहे. परभणी जिल्ह्यात 18, 36086 इतकी लोकसंख्या असून दशवार्षिक वाढीचा दर 20 .36 टक्के आहे तसेच बीड जिल्ह्यात 25, 85,049 इतकी लोकसंख्या असून लोकसंख्या वाढीचा दर 19.40 टक्के आहे जालना जिल्ह्यात 19, 58,483 इतकी लोकसंख्या असून लोकसंख्या वाढीचा दर 19.34 टक्के आहे. धाराशिव जिल्ह्यात 16, 57,576 इतकी लोकसंख्या असून वाढीचा दर 16.79 टक्के आहे. हिंगोली जिल्ह्यात 11, 77,345 इतकी लोकसंख्या असून लोकसंख्या वाढीचा दर 19.43 टक्के आहे.

कोणत्याही प्रदेशात लोकसंख्येचे वितरण समान नाही कारण मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून अनुकूल घटक सर्वत्र सारखे असत नाहीत औरंगाबाद जिल्ह्यात लोकसंख्या जास्त आढळते कारण अनुकूल हवामान कारखानदारी वाहतूक व्यापार उद्योगधंदे व्यवसाय करण्याच्या संधी रोजगाराची उपलब्धता याशिवाय शिक्षण आरोग्याच्या सुविधा मनोरंजन या सुविधा असल्यामुळे औरंगाबाद येथे लोकसंख्येचे वितरण जास्त आढळते त्याचबरोबर नांदेड बीड लातूर जिल्ह्यातील छोटे मोठे उद्योग शिक्षणाच्या सुविधा शेती योग्य जमीन अनुकूल हवामान असल्यामुळे या भागात लोकसंख्येचे केंद्रीकरण जास्त दिसून येते याउलट धाराशिव हिंगोली परभणी जिल्ह्यात उद्योगधंदे कमी प्रमाणात आढळतात कारखानदारी जास्त विकास झालेला नाही व्यवसाय करण्याच्या संधी उपलब्ध नाही यामुळे या जिल्ह्यात लोकसंख्येचे वितरण कमी आढळते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026




**लिंगगुणोत्तर :-** कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासामध्ये आणि लोकसंख्या वाढीमध्ये त्या प्रदेशातील लिंग रचनेचे महत्त्वपूर्ण भूमिका असते एकूणच लोकसंख्येतील स्त्री-पुरुषाचे प्रमाण म्हणजे लिंग रचना होय लिंगरचनेच्या अभ्यासावर स्त्री-पुरु षाचे प्रमाणाची माहिती मिळतील साधारणपणे पुरुषापेक्षा स्त्रियांची कार्य करण्याची शारीरिक क्षमता कमी असते उत्पादन कार्यामध्ये स्त्रियांचा सहभाग अतिशय कमी असतो स्त्रियांचा उत्पादन कार्यामध्ये किती सहभाग आहे यावर त्या प्रदेशातील दरडोई उत्पन्न अवलंबून असते ज्या प्रदेशांमध्ये पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या जास्त असते त्या प्रदेशात श्रमशक्तीचा पुरवठा कमी होतो तसेच लोकसंख्या वाढीचा दर जास्त असण्याची शक्यता असते तर पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या कमी असल्यास श्रम पुरवठा जास्त होतो

बालविवाह मुळे पती-पत्नीच्या वयामध्ये बरेच आंतर पडते त्यामुळे विधवा स्त्रियांचे प्रमाण जास्त असते मुलीचे विवाह लवकर होतात त्यामुळे स्त्रियांचा प्रजनन काळ वाढवून जन्मदर वाढतो तसेच पुरुषाचे प्रमाण जास्त असल्यास मृत्यू दर जास्त तर स्त्रियांचे प्रमाण पुरुषापेक्षा जास्त होऊन मृत्यू दर कमी होतो याचा परिणाम एकूण लोकसंख्या वाढीवर व गतीवर होतो

महाराष्ट्राच्या सरासरी लिंग गुणोत्तरापेक्षा मराठवाड्यातील काही जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर कमी असल्याचे दिसून येते ही एक चिंतेची बाब आहे 2011 च्या

जनगणनेनुसार महाराष्ट्राचे एकूण लिंग गुणोत्तर प्रति 1000 पुरुषामागे 929 स्त्रिया आहेत

औरंगाबाद मध्ये 917 आणि उस्मानाबाद मध्ये 920 लिंग गुणोत्तर असलेले दिसून येते तर बीड जिल्ह्यामध्ये 912 लिंग गुणोत्तर असल्याचे दिसून येते तर लातूर जिल्ह्यामध्ये 928 लिंग गुणोत्तर आढळते तर परभणी जिल्ह्यात 947 लिंग गुणोत्तर दिसून येते जालना जिल्ह्यामध्ये 929 नंतर असल्याचे दिसते तर हिंगोली जिल्ह्यांमध्ये 942 लिंग गुणोत्तर असल्याचे दिसून येते.

**मराठवाड्यातील गुणोत्तर कमी असण्याची कारणे:-**

सामाजिक दृष्टिकोन काही भागांमध्ये विशेषता ग्रामीण भागात मुलांच्या जन्माला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती अजूनही दिसून येते यामुळे लिंग निवडक गर्भपात सारख्या गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळते ज्यामुळे मुलीच्या जन्माचे प्रमाण कमी होते

बाल लिंग गुणोत्तर 06 वयोगट - मराठवाड्यातील बाल लिंग गुणोत्तर हे एकूण लिंग गुणोत्तरापेक्षा कमी आहे जे भविष्यातील लिंग संतुलना वर्णकारात्मक परिणाम करते बीड जिल्ह्याचे बाल लिंग गुणोत्तर 2011 मध्ये 881 इतके कमी होते

शिक्षण आणि जागरूकता - शिक्षणाचा अभाव आणि स्त्री-पुरुष समानतेबद्दलच्या जागृतीची कमतरता यामुळे लिंगभेद वाढू शकतो

स्थलांतर - काही प्रमाणात पुरुषाचे शिक्षण किंवा रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर झाल्यास ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तरावर परिणाम होऊ शकतो त्याचप्रमाणे स्त्रियांचे विवा नंतरचे स्थलांतर यामुळे ही लिंग गुणोत्तरा वर परिणाम होतो.

वैद्यकीय तंत्रज्ञानाचा गैरवापर- सोनोग्राफी सारख्या तंत्रज्ञानाचा वापर गर्भलिंग निदान करण्यासाठी आणि मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करण्यासाठी केला जातो ज्यामुळे लिंग गुणोत्तरात घट होते शासनाने यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी महत्वाची आहे.

**निष्कर्ष:-**

1. मराठवाड्यात सर्व भागात लोकसंख्या सारखी विभागलेली नाही.
2. मराठवाड्यात दर चौरस किमी क्षेत्रात 265 व्यक्ती आहेत हे प्रमाण प्रत्येक जिल्ह्यानिहाय वेगवेगळे आहे.
3. मराठवाड्यातील लोकसंख्येचे वितरण विषम आहे.
4. औरंगाबाद, नांदेड, लातूर जिल्ह्यात लोकसंख्या अधिक असून हिंगोली, परभणी, जालना, बीड, धाराशिव विभागात लोकसंख्या विरळ आढळते.

**संदर्भ सूची**

1. मराठवाडा काल आणि आज
2. संकेत प्रकाशन जालना पृष्ठ क्रमांक 11 ते 57
3. मराठवाडा भूगोल भाग (1)
4. प्रा. डॉ. भागवत नामदेवराव पस्तापुरे
5. अरुणा प्रकाशन पेज क्रमांक 114 ते 118
6. जिल्हा गॅझेटर लातूर, औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मानाबाद, जालना, परभणी, हिंगोली
7. जिल्हा जनगणना अहवाल नांदेड, औरंगाबाद, लातूर, बीड, उस्मानाबाद, जालना, परभणी, हिंगोली